आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० डिसेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- परभणी आणि बीड हिंसाचार प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा
- संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे
- शेअर बाजारात मोठी घसरण / सेन्सेक्स १ हजार १७६ अंकांनी, तर निफ्टी ३६४ अंकांनी गडगडला
- दैनिक देशदूतचे संस्थापक, आणि उद्योजक देवकिसन सारडा यांचं निधन

**आणि**

- ताम्हिणी घाटात वऱ्हाडाच्या बसला झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू, १७ जण जखमी, मृतांच्या कुटुंबांना राज्य शासनाकडून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर

**<><><><><><>**

बीड आणि परभणी इथं गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घटनांची न्यायालयीन चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. या प्रकरणी विरोधकांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेला ते विधानसभेत उत्तर देत होते.

परभणीतली घटना कोणत्याही समुदायांमधल्या वैरभावनेतून झाली नाही. या प्रकरणात अटकेत असलेले सोमनाथ सूर्यवंशी यांना श्वसनाचा दुर्धर आजार होता, असं ते म्हणाले. सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला १० लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा त्यांनी केली. तसंच या घटनेनंतर मृत्यू झालेले आंबेडकरवादी कार्यकर्ते विजय वाकोडे यांनी या घटनेच्या वेळी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असं सांगून, त्यांच्या कुटुंबालाही पाच लाख रुपयांची मदत फडनवीस यांनी जाहीर

केली. व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या आणि दगडफेक, जाळपोळ करणाऱ्या ५१ जणांना अटक केली असून, या प्रकरणी अतिरिक्त बळाचा वापर करणाऱ्या पोलीस निरीक्षक अशोक घोडबांड यांना निलंबित करून त्यांची चौकशी केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचं प्रकरण तेवढ्यापुरतं मर्यादित नसून याची पाळंमुळं खोदावी लागतील, असं फडणवीस यांनी सांगितलं. संतोष जाधव यांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपये मदत देण्याची घोषणा फडनवीस यांनी केली. बीड जिल्ह्यात गुन्हेगारी कारवाया करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल, असंही ते म्हणाले. …

**होल्ड - फडनवीस…..**

या प्रकरणाची चौकशी दोन प्रकारे केली जाईल. विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या अंतर्गत विशेष तपास समिती, तसंच न्यायालयीन चौकशीही केली जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. या प्रकरणात पोलीस प्रशासनाची भूमिका कुचराईची असून, बीडच्या पोलीस अधिक्षकांची बदली करणार असल्याचं फडनवीस यांनी सभागृहाला सांगितलं. मुख्यमंत्र्यांच्या या उत्तरानं समाधान न झाल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला.

**<><><><><><>**

कल्याणमधे योगीधाम सोसायटीत मराठी माणसाला मारहाण झाल्याच्या प्रकरणाची राज्य शासनानं गंभीर दखल घेतली असून दोषींवर गुन्हा दाखल करून कारवाई सुरू असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं.

विरोधी पक्षाचे सदस्य अनिल परब यांनी मारहाणीचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी झालेल्या गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज १० मिनिटं तहकूब करावं

लागलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी २८९ अन्वये याविषयी झालेल्या चर्चेला उत्तर दिलं.

मारहाण प्रकरणात दोषींवर तातडीनं कारवाई केली जाईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सांगितलं. आमदार सुनील प्रभू यांनी विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना पवार बोलत होते.

<><><><><>

कल्याणमधल्या सोसायटीत मराठी कुटुंबासोबत झालेल्या घटनेत शिवसेना मराठी कुटुंबाच्या पाठीशी ठाम असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नागपुरात वार्ताहर परिषदेत सांगितलं. शिवसेना मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढायला कटिबद्ध असून, कुणी शिवीगाळ करून मराठी कुटूंबावर हल्ला केला तर शिवसेना ते कदापि खपवून घेणार नाही असा इशारा त्यांनी दिला.

मंत्रीमंडळाच्या विस्तारात स्थान न मिळाल्यानं शिवसेनेचे आमदार विजयबापू शिवतारे, नरेंद्र भोंडकर आणि प्रकाश सुर्वे यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. शिंदे यांनी या तिघांना भेटून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यापैकी कुणीही नाराज नाही. यापुढेही सगळेजण मिळून शिवसेनेमध्ये एकत्र राहून पक्षवाढीसाठी काम करणार असल्याची ग्वाही शिंदे यांनी दिली.

<><><><><>

विधानसभेत मंजूर झालेलं महाराष्ट्र मुद्रांक दुरुस्ती विधेयक २०२४ तसंच, व्हॅट अर्थात मूल्यवर्धित कर दुरुस्ती आणि विधीग्राहीकरण विधेयक २०२४ आज विधान परिषदेत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मांडलं. या विधेयकाद्वारे आपण व्हॅटमध्ये तीन महत्त्वाच्या सुधारणा करत आहोत. त्या तिन्ही सुधारणा महसूल वाढीच्या दृष्टीनं फायद्याच्या ठरतील, असं चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र

फडनवीस यांनी सांगितलं. या दुरुस्त्यांद्वारे या कायद्याची आणि त्याद्वारे केल्या जाणाऱ्या करवसुलीची व्याख्या स्पष्ट होईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

या विधेयकाच्या चर्चेत राष्ट्रवादीचे सदस्य एकनाथ खडसे यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या. कराखेरीज इतर उत्पन्न वाढीसाठी सरकारनं प्रयत्न करणं आवश्यक असल्याचे मत यावेळी खडसेंनी व्यक्त केलं. यावर त्यांच्या मागणीनुसार इतर उत्पन्न वाढीसाठी सरकार एक उच्चस्तरीय समिती नेमेल आणि तिच्या शिफारसी गांभीर्यानं घेईल, असं फडनवीस यांनी सांगितलं. चर्चेनंतर ही दोन्ही विधेयकं विधान परिषदेत मंजूर करण्यात आली.

**<><><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आज लोकसभेत गदारोळ केला.त्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना नियमांचं पालन करण्याचं आणि संसद भवनाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन न करण्याचं आवाहन केलं. या निर्देशांचं पालन झालं नाही तर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला. संसदचं पावित्र्य कायम राखणं ही सर्व सदस्यांची संयुक्त जबाबदारी असल्याची जाणीव त्यांनी सर्व सदस्यांना करुन दिली. त्यानंतर एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली २ विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी गोंधळातच मांडला. या समितीमध्ये लोकसभेचे २७ आणि राज्यसभेचे १२ सदस्य आहेत. भाजपाचे अनुराग ठाकूर, परषोत्तम रुपाला, काँग्रेसचे प्रियंका गांधी, मनीष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांच्यासह सुप्रिया सुळे देखील या समितीच्या सदस्य आहेत. यानंतर लोकसभेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केल्याची घोषणा ओम बिर्ला यांनी केली.

राज्यसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा दोन्ही बाजूच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. गोंधळ सुरू राहिल्यानं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर गोंधळातच एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करत असल्याची घोषणा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी केली.

**<><><><><><>**

देशातल्या शेअर बाजार आठवडाभर सुरू असलेली घसरण आजही कायम राहिली. या आठवडाभरात सेन्सेक्स ४ हजारांहून अधिक आणि निफ्टी सुमारे बाराशे अंकांनी घसरला आहे. जागतिक बाजारातली घसरण, फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीचा अपेक्षेपेक्षा कमी वेग यामुळं ही घसरण झाल्याचं विश्लेषकांचं मत आहे.

दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार १७६ अंकांनी घसरुन ७८ हजार ४२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३६४ अंकांची घसरण नोंदवत, २३ हजार ५८८ अंकांवर बंद झाला.

**<><><><><><>**

नाशिकच्या दैनिक देशदूतचे संस्थापक, आणि प्रख्यात उद्योजक देवकिसन सारडा यांचं आज अल्प आजारानं निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, नाशिक जिल्हा सहकारी बँक, सिन्नर व्यापारी बँक, कुसूमाग्रज प्रतिष्ठान, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अशा विविध संस्थांमधे त्यांनी पदं भूषवली असून या संस्था वाढवण्यात त्यांचा मोलाचा सहभाग होता. अखिल भारतीय लघु उद्योग महासंघाचे ते माजी अध्यक्ष होते. आज संध्याकाळी सातपूर इथल्या त्यांच्या निवासस्थानापासून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात येत आहे.

**<><><><><><>**

रायगड जिल्ह्यात ताम्हिणी घाटात आज सकाळी एका खासगी बसला झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला तर १७ जण जखमी झाले. ही बस पुण्याहून महाडच्या दिशेने लग्नाचं वऱ्हाड घेऊन निघाली होती. या बसमध्ये ३० ते ३५ प्रवासी होते. वाटेत ताम्हिणी घाटातल्या वळणावर चालकाचं नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. मृतांमध्ये तीन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. जखमींवर माणगावच्या उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख रुपयांचं अर्थसहाय्य करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली आहे.

**<><><><><>**

राज्यात पुढच्या दोन ते तीन दिवसांत हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. थंडीची लाट आल्यामुळे सर्वत्र तापमानात घट झाली असून गेल्या २४ तासांत जळगाव जिल्ह्यात सर्वात कमी ९ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं आहे.